# संस्कार मंदिर संस्थेचे

# कला व वाणिज्य महाविद्यालय,

# वारजे माळवाडी, पुणे - ५८

## विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास योजना २०१६ - २०१७

## वार्षिक अहवाल २०१६ - २०१७

सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ अंतर्गत 'विद्यार्थी विकास मंडळ' या विभागाअंतर्गत महाविद्यालयात 'विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास योजना राबविण्यात आली. सदर योजनेसाठी महाविद्यालयाने विदयापीठाकडे शैक्षणिक वर्ष २०१६ - २०१७ साठी प्रस्ताव पाठविला होता. या प्रस्तावानुसार विदयापीठाने महाविदयालयास विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास योजनेस दिनांक ०३/०८/२०१६ रोजी मान्यता दिली.

या योजनेअंतर्गत महाविद्यालयातील एकुण ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या योजनेअंतर्गत महाविद्यालयात दिनांक ०७-०२-२०१७ रोजी एकदिवसीय शिबीराचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी सदर शिबीरांतर्गत मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविदयालयाचे उपप्राचार्य प्रा.आशुतोष कसबेकर यांनी केले.

एक दिवसीय शिबीरामध्ये ३ व्याख्याते सहभागी असून यामध्ये पहिल्या सत्रात प्रा. स्नेहा गायकवाड यांचे 'जीवन सुंदर आहे', आणि 'छत्रपती शिवाजी महाराजांचे स्त्रीविषयक धोरण' या २ व्याख्यानानंतर चहापान विश्रांती घेण्यात आली. त्यानंतर 'राजमाता जिजाऊ व्यक्ती आणि विचार' या विषयांवर मार्गदर्शनपर व्याख्यान झाले. यानंतर शिबीराच्या दुसऱ्या सत्रामध्ये प्रा. मीना रणपिसे यांनीही मार्गदर्शनपर व्याख्यान दिले ज्यामध्ये त्यांनी 'प्रसार माध्यमांचा समाजावर होणारा परिणाम, 'लघुपटातून व्यक्त होणारे सामाजिक प्रश्न' आणि सामाजिक प्रश्नांबाबत जागती या विषयावर मार्गदर्शन केले. यानंतर प्रमुख मार्गदर्शक व विद्यार्थ्यांनी भोजन व विश्रांती घेतली.

शिबीराच्या शेवटच्या सत्रामध्ये डॉ. सविता कुलकर्णी यांनी 'आपत्ती व्यवस्थापन', 'पर्यटन व्यवसाय आणि रोजगार संधी' आणि जागतिक तापमान वाढ कारणे व उपाय या विषयावर व्याख्यान दिले.

शिबीराच्या समारोपाच्या कार्यक्रमात महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. आशुतोष कसबेकर सर यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. 'विद्यार्थी विकास मंडळ' प्रमुख प्रा. प्रांजली विदयासागर उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. स्वाती जगताप, सूत्रसंचालन डॉ. राजेंद्र थोरात व आभार प्रदर्शन प्रा. प्रांजली विदयासागर यांनी केले.

Bidyasagar
विद्यार्थी कल्याण अधिकारी
(S.W.O.)
कला व वाणिज्य महाविद्यालय
वारजे-माळवाडी, पुणे-५८

कला व वाणिज्य महाविद्यालय
आयडी क्र. PU/PN/AC/149/2000
19/9/2000
वारजे-माळवाडी, पुणे-५८

PRINCIPAL
Arts & Commerce College
Warje-Malwadi, Pune-58



POCO
SHOT ON POCO M2